क्रमांक : ९७०५ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ३० ऑगस्ट, २०२४

:: **कार्यालयीन आदेश** ::

मा.मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या सचिवालयातील विधी विषयक बाबींसंदर्भातील कामकाजाकरिता एमपॅनलमेंटद्वारे (Empanelment) श्रीमती सायली सु.कांबळी यांची करार पध्दतीने या आदेशाच्या दिनांकापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात येत आहे. सदर नियुक्ती ही शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे या संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक :- संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांकित १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे. श्रीमती कांबळी यांच्या पदाचे नामाभिधान "सेवानिवृत्त उप सचिव (विधी)" असे राहील. श्रीमती सायली सु. कांबळी, सेवानिवृत्त उप सचिव (विधी) यांना सदरहू नियुक्तीच्या कालावधीत खालील नमूद अटी व शर्ती लागू असतील :-

**१) पारिश्रमिक :-**

श्रीमती सायली सु. कांबळी यांना नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात आले आहे (श्रीमती कांबळी यांचे मासिक पारिश्रमिक निश्चितीचे आदेश स्वतंत्र निर्गमित करण्यात येतील.) या प्रमाणे निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक श्रीमती कांबळी यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहिल.

**२) भत्ते :-**

श्रीमती कांबळी यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५%" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय राहील.

२/..

**३) प्रवास व दैनिक भत्ता :-**

श्रीमती कांबळी यांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) श्रीमती कांबळी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे त्यांना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

**५) इतर अटी व शर्ती :-**

**(एक)** करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे श्रीमती कांबळी यांना शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

**(दोन)** नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी श्रीमती कांबळी यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

**(तीन)** श्रीमती कांबळी त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेले नसावे.

**(चार)** श्रीमती कांबळी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

**(पाच)** श्रीमती कांबळी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्र / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

**(सहा)** श्रीमती कांबळी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. श्रीमती कांबळी यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन त्यांच्या कामाचे मूल्यमापन करतील.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या श्रीमती कांबळी यांच्या पारिश्रमीका व भत्यापोटी येणारा खर्च "मागणी क्रमांक झेडसी-१, "२०११, संसद/राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, ०२ राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, १०- कंत्राटी सेवा (दत्तमत), " या लेखाशिर्षाखालील मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३/..

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्तीच्या कालावधीतील करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी श्रीमती कांबळी यांची राहिल व तशा आशयाचे बंधपत्र/ हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच, करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत आणि नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही याचा देखील उल्लेख सदरहू बंधपत्र/ हमीपत्रात श्रीमती कांबळी यांनी करावा.

**आदेशानुसार,**

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**श्रीमती सायली सुचित कांबळी,**
१२ अे-१, शासकीय वसाहत, हाजी अल्ली महालक्ष्मी मुंबई-४०००३४

**प्रतिलिपी -:**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) सचिव (१), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव (२), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१०) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
११) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१२) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१३) "क-२" (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१४) निवडनस्ती